# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक ः
०२०-२५६९१३४१, २५६०१२०६

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
फॅक्स ः ०२०-२५६०१२०६
०२०-२५६९१३४१
Website : www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in

संदर्भ ः परीक्षा-समन्वय/९७७

दिनांक ः २१ सप्टेंबर, २०१२

मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था

विषय : महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी नियुक्तीबाबत ...

महोदय / महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार महाविद्यालय / परीक्षा केंद्रावर परीक्षेचे कामकाज अधिक प्रभावीपणे, काटेकोर आणि कार्यक्षमतेने होण्यासाठी, तसेच विद्यापीठ परीक्षा विभाग व महाविद्यालय / परीक्षा केंद्र यांचेमध्ये अधिक सुसूत्रता व समन्वय निर्माण होण्यासाठी प्रत्येक महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेत “महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी” ( College Examination Officer ) नियुक्त करावयाचा आहे.

सदर नियुक्ती मा. प्राचार्य / संचालक यांनी त्यांचे महाविद्यालय / संस्थेमधील शिक्षकांमधून तीन वर्षांसाठी करावयाची आहे. त्यासाठी आवश्यक पात्रता, कर्तव्ये आणि जबाबदारी इत्यादी बाबतची माहिती सोबत जोडली आहे.

सदर नियुक्तीस विद्यापीठ मान्यता देणार असून, नियुक्त महाविद्यालयीन परीक्षा अधिकाऱ्यास मान्यतेचे पत्र, संपूर्ण कामकाजाबाबत मार्गदर्शनासाठी ऑक्टोबर महिन्याचे पहिल्या सप्ताहात आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यशाळेत देण्यात येईल.

नामनिर्देशित शिक्षकाची माहिती सोबतच्या (Excel sheet) तक्त्यामध्ये भरून दि. २९ सप्टेबर, २०१२ पूर्वी ईमेल व्दारे (examcoordination@unipune.ac.in) विद्यापीठास कळवावी. तसेच या नामनिर्देशन पत्राची प्रत उपरोक्त कार्यशाळेच्या वेळेस सादर करावी. कार्यशाळेसंबंधीचा तपशील लवकरच स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

आपली

परीक्षा नियंत्रक

सोबत: १ पात्रतेबाबतची माहिती
२ माहिती सादर करण्यासाठी विहित नमूना